प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

# प्रकरण पहिले
# प्रास्तविक

प्राचिन काळापासून भारतीय राजकीय विचारवंतांची प्रदीर्घ परंपरा आढळते. कौटिल्य, राजा राममोहन रॉय, दादाभाई नौरोजी, महादेव गोविंद रानडे आदी विचारवंतांपासून ते म. गांधी, डॉ. लोहिया, पं. नेहरू, सुभाषचंद्र बोस, डॉ. आंबेडकर प्रभृतीपर्यंत अनेकांनी आधुनिक भारतीय राजकीय विचारात भर घातली आहे. त्यातील अनेकांचे विचार विद्याशाखीय पद्धतीशास्त्राच्या कसोटीला उतरत नसले तरी त्यांच्या व्यापक भाषण व लेखनातून साकारलेल्या विचारात अधिकृतता,उत्कटता आणि राष्ट्रीयता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भारतीय विचारवंताचा अभ्यास करावा लागतो. आजवरच्या सर्वच आधुनिक राजकीय वितारवंतांनी कृतिशील विचार परंपरा निर्माण केली आहे. सभोवतालच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक वातावरणाचा प्रभाव त्यांच्या विचारांवर झालेला दिसतो. परिवर्तन हा त्यांच्या चिंतनातील समान धागा आहे. दुसरे एक वैशिष्ट्ये म्हणजे बहुतेक सर्व विचारवंतांनी राजकीय, सामाजिकपरिवर्तन चळवळीचे नेतृत्वही केले आहे. त्यांच्या विचारांचा आढावा घेत असताना तत्कालीन सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचे संदर्भ तर मिळतातच. शिवाय आजच्या परिस्थितीत त्यांच्या विचारांच्या प्रस्तुततेचे संदर्भही सापडतात का? हे शोधण्याची संधी संशोधकाला मिळते. तसेच त्यांचे नेतृत्व, कर्तृत्व व विचार यांचा साकल्याने अभ्यास होतो. त्यांच्या नेतृत्वाला आणि विचारांना कोणकोणते घटक प्रेरणादायी ठरले याचाही शोध घेणे त्या अनुषंगाने आवश्यक ठरते.

वसाहतवादी परकीय राजसत्तेच्या जोखडातून हिंदुस्थानी समाजाची सुटका करण्यासाठी अनेक ध्येयवेड्या, प्रतिभासंपन्न नवशिक्षित तरुण देशभक्तांनी आपले प्राण

पणाला लावले, तर काहींनी स्वातंत्र्य आंदोलनात सर्व समाजाला गुलामगिरीची जाणीव करून देऊन समग्र समाज परिवर्तनाचे धडे दिले. सार्वजनिक प्रश्नांची जाहीर चर्चा करण्याचे वैचारिक व्यासपीठ त्यांनी मिळवून दिले. म्हणूनच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीत अनेक नेत्यांचे आणि विचारवंतांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. राजा राममोहन रॉय, गोपाल गणेश आगरकर, महात्मा फुले, राजर्षि शाहू यांनी समाजसुधारणेतून सामाजिक स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा केला. तर दादाभाई नौरोजी, गोपाळकृष्ण गोखले, न्या. रानडे, म. गांधी, पं. नेहरू आदींनी नेमस्त व मवाळवादी भूमिकेतून स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले. याशिवाय बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक या जहालवाद्या नेत्यांनी पारतंत्र्याविरुद्ध लढा दिला. त्यांचा मवाळवाद्यांच्या भूमिकेला प्रखर विरोध होता. ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा देणारी आणखी एक फळी जहाल क्रांतिकारक विचारवंतांची होती. त्यात प्रामुख्याने वासुदेव बळवंत फडके, वि. दा. सावकर, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, तात्या टोपे यांचा समावेश होता. या दोन्ही मार्गांपेक्षा सुभाषचंद्र बोस यांनी वेगळी भूमिका घेतली होती. इंग्रजांच्या दडपशाही धोरणाविरुद्ध राष्ट्रीय सभेने घेतलेल्या तडजोडीच्या प्रत्येक बाबीला त्यांनी विरोध दर्शविला. प्रखर राष्ट्रवादाने प्रेरित होऊन सुभाषबाबूंनी व्यवहारवादी व वास्तववादी भूमिकेतून ब्रिटीश राजवटीविरुद्ध सशस्त्र सेनेची निर्मिती केली. त्यासाठी जगातील इंग्रजांच्या शत्रू देशांची मदत त्यांनी मिळविली. तत्कालीन राष्ट्रवाद्यांपेक्षा सुभाषबाबूंनी घेतलेली ही भूमिका वैशिष्ट्यपूर्ण होती.

भारतीय राजकीय विचारवंतांना अभ्यास करत असताना एकीकडे बुद्धीवादी विचारसरणीचा स्वीकार करणारे विचारवंत आहेत. तर दुसरीकडे जहाल राष्ट्रवादाचा अंगीकार करणाऱ्यांचा विचारप्रवाह आहे. या दोन विचारप्रवाहांमध्ये समन्वय साधून सुभाषबाबूंनी आपल्या कृतिशील व व्यवहारवादी विचारांची मांडणी केली आहे. ते प्रखर राष्ट्रवादी तर होतेच शिवाय ते विज्ञाननिष्ठ, बुद्धीवादी, आधुनिकतेचा पुरस्कार करून

धर्मनिरपेक्ष, लोकशाही, समाजवादी विचारांचे पायिक होते. सुभाषबाबू केवळ तत्त्वचिंतक नव्हते तर जनसामान्यांचे नेते होते. म्हणून त्यांच्या कृतीशील विचारांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून प्रस्तुत शोधप्रबंधाचा विषय 'सुभाषचंद्र बोस यांचे राजकीय विचार' हा निवडला आहे.

१९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर स्वातंत्र्य लढ्याचे व राष्ट्रीय सभेचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र होईपर्यंत त्यांचेच नेतृत्व कायम राहिले. त्यावळेस नेताजी इंग्लंडमध्ये आय.सी.एस.चे शिक्षण घेत होते. चौथ्या क्रमांकाने आय.सी.एस.पास होऊनही त्यांनी ब्रिटिशांची गुलामगिरी जुगारून दिली. त्यांना भौतिक सुखापेक्षा देशभक्ती थोर वाटली म्हणून त्यांनी आय.सी.एस. नोकरी नकार देऊन स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली.

पं. जवाहरलाल नेहरू, एम. एन. रॉय, बॅ. वि. दा.सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सुभाषचंद्र बोस अशा उच्च विद्याविभूषित तरुणांनी स्वातंत्र्य लढ्याची कास धरली होती. त्यातील काहींनी म. गांधीजींचे अनुयायित्व पत्करले असले तरी रॉय, सावरकर, डॉ. आंबेडकर आणि सुभाषबाबूंनी आपली स्वतंत्र वैचारिक भूमिका घेऊन गांधींना वैचारिक विरोध केला. सुभाषबाबूंनी १९२१ मध्ये राजकारणात सक्रीय प्रवेश केला. तेव्हापासून म. गांधी व बोस यांच्यात वैचारिक मतभेद निर्माण झालेले दिसतात. हा वाद स्वतंत्र भारताच्या पुनर्निर्माण भूमिकांबाबत होता. एकाच समाजध्येयाप्रत जाणारे हे दोन स्वतंत्र विचारप्रवाह होते.

नवराष्ट्र निर्माणाचे स्वप्न उराशी बाळगून सुभाषचंद्र बोस यांनी १९२१ नंतर स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. बंगालच्या तरुणांचे आकर्षण असणारे देशबंधू चित्तरंजन दास यांना सुभाषबाबूंनी राजकीय गुरू मानले. दासांच्या कार्यामुळे आणी त्यांच्या

स्वराज्यवादी भूमिकेमुळे सुभाषबाबू त्यांच्याकडे आकर्षित झाले. सुभाषबाबूंमधील ध्येयनिष्ठा आणि प्रखर राष्ट्रवाद दासांनी जाणून सुभाषबाबूंचे शिष्यत्व मान्य केले.

डिसेंबर १९२१ मध्ये पुकारलेल्या असहकार आंदोलनाचे नेतृत्व कलकत्त्यामधील सुभाषबाबूंनी केले. त्यामुळे १० डिसेंबर १९२१ या दिवशी त्यांना पहिल्यांदाच अटक होऊन सहा महिन्यांची शिक्षा झाली. या त्यागी व धाडसी वृत्तीतून सुरू झालेला त्यांचा राजकीय जीवनप्रवास जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत अखंडपणे सुरू राहिला. स्वातंत्र्य आंदोलन एका निर्णायक टप्प्यावर आले असताना नेताजींच्या रूपाने धाडशी व कर्तृत्ववान तरुण नेतृत्व साकारले. संपूर्ण जीवन संघर्षमय जगत असताना जनतेचा नेता म्हणून सुभाषचंद्र बोस यांचे नेतृत्व सर्वमान्य झाले.

चित्तरंजन दासांबरोबर स्वराज्य पक्षात सहभागी होऊन सुभाषबाबूंनी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला. मात्र नंतर दास यांच्या मृत्यूनंतर स्वराज्य पक्षाबरोबर सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत कार्य करण्यास सुरुवात केली. काँग्रेसच्या व्यासपीठावर त्यांना अनेक वैचारिक संघर्षाला सामोरे जावे लागले. ब्रिटीशांशी तडजोड करण्याच्या वृत्तीला त्यांनी आक्षेप नोंदविला. तसेच संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला. काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढवून गांधीवाद्यांचा विरोध पत्करला. या सर्व घडामोडींमधून सुभाषबाबूंनी १९३९ मध्ये फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना केली. काँग्रेसचे स्वरूप बदलावे आणि राष्ट्रवादी चळवळ अधिक आक्रमक करावी ही भूमिका घेऊन त्यांनी फॉर्वर्ड ब्लॉकची स्थापना केली. याशिवाय काँग्रेस अंतर्गत कार्यरत असलेला डाव्यांची इच्छा व आंतरराष्ट्रीय पातळीवर घडून आलेल्या तत्कालीन घडामोडी फॉर्वर्ड ब्लॉकच्या निर्मितीस कारणीभूत ठरल्या. सर्व डाव्या पुरोगामी विचारप्रवाहांनी एकत्र यावे ही भावना त्याच्या तळाशी होती. मात्र, यात सुभाषबाबूंना अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. फॉर्वर्ड ब्लॉकला 'समाजवादी' विचारांची बैठक होती. काँग्रेसला शह देणे हा संकुचित हेतू न ठेवता काँग्रेस

अंतर्गत राहूनच साम्राज्यवादाविरुद्धच्या लढाईत काँग्रेसला अधिक लढाऊ रूप देण्याचा उद्देश फॉर्वर्ड ब्लॉकच्या स्थापनेमागे होता. त्याच्या माध्यमातून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सुभाषबाबूंनी केलेले कार्य अद्वितीय व स्तुत्य ठरले. त्यांचाही आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा उद्देश आहे. त्यात आजच्या तरुण पिढीला मार्गदर्शक व प्रेरणादायी संदर्भ कोणते आहेत? त्याचाही उलगडा होणे आवश्यक वाटते.

सुभाषबाबू हे केवळ तत्वज्ञान मांडणारे तत्वज्ञ नव्हते तर ते एक स्वातंत्र्य आंदोलनातील प्रमुख नेतृत्वही होते. त्यांच्या विचारांचा आढावा घेत असताना तात्विक व व्यावहारिक अशा दोन्ही अंगांनी विचार करावा लागतो. तत्कालीन समाजाला त्यांनी केवळ नेतृत्वच दिले नाही तर त्याबरोबर मौलिक विचारांचा ठेवाही दिला आहे. विचार, कार्यकर्तृत्व आणि नेतृत्व या तिन्हींचा संगम सुभाषबाबूंच्या ठायी झाला होता.

राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस, योगी अरविंदो, चित्तरंजन दास ही बंगालची वैभवशाली विचारपरंपरा सुभाषबाबूंच्या रूपाने अखंडपणे सुरू राहिली. त्यांनी केवळ बंगाली समाजावरच आपला वैचारिक ठसा उमटविला नाही तर संबंध भारतीय समाजापुढे वैचारिक ठेवा ठेवला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर सुभाषबाबूंनी स्वातंत्र्य चळवळीत दिलेल्या योगदानाचा व त्यांच्या वैचारिक वारशाचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात केलेला आहे.

**संशोधनामागील भूमिका व प्रयोजन :**

ब्रिटीशांच्या साम्राज्यवादातून मुक्त होण्यासाठी अनेक थोर नेत्यांनी स्वतःचे संपूर्ण जीवन वेचले. दीडशे वर्षाच्या प्रदीर्घ लढ्याद्वारे त्यांनी घेतलेल्या अपार कष्टातून भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले. परंतु या स्वराज्यासाठी घडलेल्या प्रदीर्घ इतिहासाचे विस्मरण आजच्या पीढीला होऊ लागले आहे. त्यामुळे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी जबरदस्त इच्छाशक्तीने

ब्रिटीश सत्तेविरुद्ध दिलेला धाडसी लढा अभ्यासण्याचा उद्देश प्रस्तुत शोधप्रबंधात आहे. त्याद्वारे बोस यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान समाजापुढे ठेवता येईल.

आम्ही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रजासत्ताक गणराज्याचा अर्थात लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार करून नवराष्ट्रबांधणीचे स्वप्न पाहिले. मात्र पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त झालेल्या भारतीय जनतेला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले आहे का? याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. धर्मांधता, त्यातून उद्‌भवलेली जमातवादाची समस्या, लोकसंख्या, बेरोजगारी, निरक्षरता, आर्थिक विषमता या सर्व प्रश्नांचे स्वरूप दिवसेंदिवस उग्र व व्यापक बनू लागले आहे. या सर्व समस्यांच्या संदर्भात सुभाषचंद्र बोस यांनी ज्या विचारांची मांडणी केली आहे. त्याचा अभ्यास करण्याचाही हेतू आहे.

लोकशाहीला बळकट करून ती अधिक प्रभावी व परिणामकारक करण्याची जबाबदारी ही राजकीय पक्षांवर असते. विचारधारेच्या अधिष्ठानावर सत्तेसाठी स्पर्धा होणे लोकशाहीत अपेक्षित असते. परंतु आजच्या सत्तापिपासू राजकीय पुढाऱ्यांच्या विधिनिषेधशून्य राजकारणामुळे राजकीय पक्षांची प्रतिमा मलिन झाली आहे. या पार्श्वभूमीवर सुभाषबाबूंनी स्थापन केलेल्या फॉर्वर्ड ब्लॉक या पक्षाचे वैचारिक व व्यावहारिक अधिष्ठान या शोधप्रबंधात अभ्यासण्याचा उद्देश आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रस्थापित होणाऱ्या नव्या स्वराज्याचे आराखडे सुभाषचंद्रांनी सुरुवातीपासूनच बांधायला सुरुवात केली होती. नवराष्ट्रबांधणीबाबत त्यांनी केलेल्या भरीव सूचनांचा व कल्पनांचादेखील अभ्यास करणे आवश्यक वाटते. ते समाजवादी असले तरी पोथीनिष्ठता बाजूला ठेवून व्यवहारवादी दृष्टिकोनातून विशिष्ट मर्यादित औद्योगिकरणाचे समर्थन ते करतात. याशिवाय कृषीक्षेत्राचे आधुनिकीकरण, नियोजन, जमीन सुधारणा, सहकार क्षेत्राचा विकास, ग्रामीण विकास आदीसंदर्भात त्यांनी सविस्तर वैचारिक मांडणी

केली आहे. या पार्श्वभूमीवर नेताजींचे विचार अभ्यासणे आवश्यक वाटते. त्यातून आजच्या समाजाला प्रेरणा देणाऱ्या घटकांचा उलगडा होईल.

**संशोधन आराखडा -**

प्रस्तुत शोधप्रबंधाचा विषय 'सुभाषचंद्र बोस यांचे राजकीय विचार' हा आहे. त्यामुळे शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात प्रास्ताविक लिहिले आहे. प्रस्तुत प्रास्ताविकात संशोधन विषय निवडीचे प्रयोजन व महत्त्व स्पष्ट केले आहे. याशिवाय संशोधन आराखडाही स्पष्ट करून संशोधन पद्धती नमूद केली आहे.

सुभाषबाबूंच्या राजकीय विचारांचा आढावा घेण्याअगोदर त्यांचा जीवन परिचय व त्यांच्यावर पडलेला राजकीय प्रभाव यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून शोधप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात जीवन परिचय व त्यांच्यावर पडलेल्या राजकीय प्रभावाचा अभ्यास केला आहे. सुभाषबाबूंच्या व्यक्तिमत्व जडणघडणीत त्यांच्या कौटुंबिक वातावरणाचा विशेष प्रभाव पडललेला आहे. त्यांच्या भावी राजकीय वाटचालीमध्ये कौटुंबिक वातावरणाचे प्रतिबिंब उमटले आहे. सुभाषबाबूंच्या बालपणी आणि त्यांच्या तारुण्यात शिक्षण घेत असताना त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे अनेक प्रभावशाली घटक कारणीभूत ठरले आहेत. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत ज्या भूमिका बजावल्या आहेत. त्यातील काही स्वयंप्रेरणेने बजावल्या आहेत. मात्र, त्यांच्या बऱ्याच कृती आणि विचारांवर गतकालिन व्यक्ती आणि चळवळींचा प्रभाव पडलेला आहे. त्यात त्यांच्या आई प्रभावतीदेवी, पिता जानकीदास, वडीलबंधू शरदचंद्र यांच्यासह स्वामी विवेकानंद, योगी अरविंदो, महात्मा गांधी, चित्तरंजन दास यासारख्या महनीय व्यक्तींचा उल्लेख करावा लागतो.

शोधप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात सुभाषबाबूंच्या राजकीय सहभागाचा आणि स्वातंत्र्य आंदोलनातील योगदानाचा अभ्यास केला आहे. त्यात सुभाषबाबूंचे गुरू चित्तरंजन

दास यांच्याकडून घेतलेले राजकीय धडे, महात्मा गाधींविषयी त्यांचे विचार, काँग्रेसच्या व्यासपीठावर झालेले वैचारिक मतभेद, फॉर्वर्ड ब्लॉकची स्थापना, हरिपूर काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक, आझाद हिंद फौजेच्या माध्यमातून उभारलेला स्वातंत्र्य लढा या सर्व घडामोडींची मांडणी केली आहे. तसेच राजकीय जीवनात त्यांनी भोगलेला तुरुंगवास, विजनवास, तत्कालीन आंतरराष्ट्रीय संदर्भ लक्षात घेऊन सुभाषचंद्रांनी इतर राष्ट्रांची घेतलेली मदत यांचाही त्यात अभ्यास केला आहे. प्रस्तुत शोधप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात सुभाषबाबूंच्या राजकीय सहभागाचे अंशतः संदर्भ आले आहेत. मात्र, शोधप्रबंधाचा विषय 'सुभाषचंद्र बोस यांचे राजकीय विचार' हा असल्यामुळे त्यांच्या राजकीय सहभागाचा व योगदानाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात स्वतंत्रपणे केला आहे. त्यातून आपल्या स्वप्नातील नवभारत साकारण्यासाठी त्यांनी स्वीकारलेली धाडशी आव्हाने, स्वतःचे जीवन व संसार यांचा केलेला त्याग, स्वराज्याबद्दल अपार निष्ठा या सर्व बाबींच्या संदर्भाची मांडणी केली आहे.

शोधप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात सुभाषबाबूंच्या राजकीय विचारांचा अभ्यास केला आहे. सुभाषबाबू नेहमी कार्यप्रवण असल्यामुळे ते वैचारिक मांडणीत फारसे योगदान देऊ शकले नाहीत. मात्र, तरीही त्यांनी स्वातंत्र्य चळवळीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वैचारिक बांधिलकीला बगल दिली नाही. त्यांनी आपल्या कृतीशील जीवनातून उत्कट सुसंवादी विचारांची मांडणी केलेली आहे. त्यांनी व्यवहारवादी वागण्यातून, बोलण्यातून व कृतीतून स्वतःचे एक वेगळे वैचारिक अधिष्ठान निर्माण केले आहे. त्यांनी समाजवाद, स्वराज्य, लोकशाही, धर्मनिरपेक्षता व सामाजिक सुधारणेबाबत मौलिक विचार मांडले आहेत. त्यांची वेगवेगळी भाषणे, त्यांनी लिहिलेले ग्रंथ, कृतिशील वाटचालीतून त्यांचे घडलेले वैचारिक दर्शन, स्वतः लिहिलेले पत्रे या सर्वांचा अभ्यास करून सुभाषबाबूंच्या वैचारिक अधिष्ठानाचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. त्याची मांडणी पुढीलप्रमाणे केली आहे.

**समाजवाद -**

सुभाषबाबूंच्या बालवयापासूनच समाजातील दीन-दलित, उपेक्षित यांच्याबद्दल त्यांच्यात आस्थेची भावना बळावत गेली. सुभाषबाबू समाजवादाकडे का व कसे आकर्षित झाले, त्यांची समाजवादाबद्दल कोणती धारणा होती याचाही अभ्यास त्यात केला आहे. स्वातंत्र्य आंदोलनाच्या शेवटच्या टप्प्यात भारतीय राष्ट्रवादी चळवळीत डाव्या विचाराला व्यापक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे कार्य सुभाषबाबूंनी केले. काँग्रेसच्या व्यासपीठावर डाव्यांना एकत्र आणण्यासाठी केलेले प्रयत्न, राष्ट्रीय नियोजनाबद्दल तसेच दारिद्र्य, बेरोजगारी निर्मूलनविषयक विचारांचा अभ्यास समाजवादात केला आहे.

**स्वराज्य-**

सुभाषबाबू आपल्या स्वप्नातील नवभारत घडविण्याची महत्त्वकांक्षा उराशी बाळगून होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर 'स्वराज्य' कसे असेल याबाबत नेताजींची स्पष्ट संकल्पना होती. सुभाषबाबूंनी सातत्याने पूर्ण स्वराज्याचा आग्रह धरला होता. आपल्या वैभवशाली इतिहास परंपरेची जाणीव करून देऊन साम्राज्यवादाच्या विनाशकारी परिणामांचीही जाणीव त्यांनी तत्कालीन युवकांना करून दिली होती. अरविंदोंप्रमाणेच स्वराज्य हे सुभाषबाबूंचे अंतिम ध्येय होते. त्यांच्या स्वराज्य कल्पनेत केवळ राजकीय स्वातंत्र्याचा अंतर्भाव नव्हता तर सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करणे, जमातवाद नाहीसा करून धार्मिक सहिष्णुता वाढविणे हेदेखील त्यांना स्वराज्यात अभिप्रेत होते.

**लोकशाही-**

सुभाषबाबूंनी पाश्चात्य लोकशाहीतील वैगुण्यांवर अचूक बोट ठेवून भारतात लोकशाही यशस्वी करण्यासाठी योग्य जनजागृती, जनमत, संघटित राजकीय पक्ष, सहिष्णुता अशा घटकांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले आहे. लोकशाहीच्या नावाखाली स्वैराचार निर्माण होऊ नये म्हणून सुभाषबाबूंनी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मुस्तफा

केमाल पाशाप्रमाणे संक्रमण काळासाठी केंद्रोन्मुख शासनाची कल्पना मांडली आहे. भारतातील जटील समस्यांवर सुभाषबाबूंना तो एक चांगला इलाज वाटत होता. असे असले तरी ते हुकूमशाहीचे समर्थक नव्हते. त्यांनी आपला पक्ष नाझी पक्षाप्रमाणे व्यक्तिकेंद्रीत पक्ष बनणार नाही, असे जाहीर अभिवचनही दिले होते. त्यांनी राजकीय लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक व आर्थिक लोकशाहीचाही पाठपुरावा केला आहे. या सर्वांचा परामर्श लोकशाहीच्या अभ्यासात घेतला आहे.

**धर्मनिरपेक्षता -**

धर्मनिरपेक्षता हे सुभाषबाबूंच्या विचारातील मूलभूत तत्व होते. हिदुस्थानची राष्ट्रीय एकात्मता, जमातवादाचे आव्हान या तत्कालीन महत्त्वाच्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर सुभाषबाबूंची धर्मनिरपेक्षतेबाबतची धारणा जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला आहे. ब्रिटीशांचा 'फोडा व झोडा' या कुटनीतीचा अवलंब करून स्वातंत्र्य चळवळ क्षीण करण्याचा प्रयत्न यशस्वी ठरू लागला होता. याची जाणीव सुभाषबाबूंना होती. म्हणून त्यांनी व्यक्तीगत व सार्वजनिक जीवनात धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला प्रमाण मानले होते. भारतीय समाजाला धर्मरिपेक्षेचा आदर्श घालून देण्याचे कार्य त्यांनी केले. सी. आर.दास यांनी घालून दिलेली धर्मनिरपेक्षतेची प्रथा सुभाषबाबूंनी कधीही मोडली नाही. आझाद हिंद फौजेच्या माध्यमातून त्यांनी घालून दिलेला धर्मनिरपेक्षतेचा आदर्श मौलिक होता. बॅ. जीनांना देशाचे पंतप्रधानपद देऊ करण्याचा प्रस्ताव मांडून त्यांनी द्विराष्ट्रवादाच्या समस्येवर उपाय सुचविला. राष्ट्रीय ऐक्य आणि धर्मनिरपेक्षतेची सांगड त्यांनी घातली होती, हे त्यांच्या विचाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

**सामाजिक सुधारणा -**

सुभाषबाबूंना राजकीय परिवर्तनाबरोबरच सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिवर्तन अभिप्रेत होते. त्या अनुषंगाने त्यांच्या सामाजिक सुधारणांच्या संदर्भातील विचारांची मांडणी

प्रस्तुत प्रकरणात केली आहे. त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रत्येकाला समान हक्क मिळाले पाहिजेत याबाबत आग्रही भूमिका घेतलेली दिसते. तसेच कोणताही धर्म उच्च-नीचतेची शिकवण देत नाही. ही विवेकानंदांची शिकवण सुभाषबाबूंनी आत्मसात केली होती. त्यामुळे त्यांनी धर्मभेद, जातीभेद यासारखे क्षुद्र विचार अमान्य केले. त्यांनी पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही आझाद हिंद फौजेमध्ये संधी देऊन झाशी राणी रेजिमेंटची स्थापना केली आणि स्त्रीवादी विचारांचा कृतिशील आदर्श घालून दिला. त्याचबरोबर समाजातील दारिद्रय, लोकसंख्या वाढ, बेकारी, शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधी मौलिक विचार मांडले आहेत. केवळ तत्वचिंतनात्मक मांडणी न करता व्यवहारवादी व कृतिशीलतेतून त्यांनी सामाजिक सुधारणांची कास धरली होती.

शोधप्रबंधाच्या पाचव्या प्रकरणात नेताजींच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाचा, राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक विचारांचा आणि त्यांच्यावर केल्या जाणाऱ्या टिकेचा आढावा घेतला आहे. तसेच नवभारताच्या जडणघडणीमध्ये त्यांनी दिलेले योगदान याचाही परामर्श घेतला आहे. आजच्या काळाच्या संदर्भात त्यांच्या विचारांशी प्रस्तुतताही विचारात घेतली आहे.

**संशोधन व्याप्ती -**

सुभाषचंद्र बोस या अभ्यासाचा विषय म्हणून अत्यंत व्यापक आहे. त्यांचे नेतृत्व, स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, राजकीय विचार, आझाद हिंद सेनेचे कार्य हे त्यांच्या अभ्यासाचे स्वतंत्र विषय बनू शकतात. मात्र, प्रस्तुत शोधप्रबंधाचा विषय 'सुभाषचंद्र बोस यांचे राजकीय विचार' हा निवडला आहे. त्यामुळे नेताजींचा व्यापक अभ्यास करण्यावर मर्यादा पडतात. त्यामुळे त्यांच्या राजकीय विचारांत त्यांचे समाजवाद, स्वराज्य, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक सुधारणांबाबत विचारांचा अभ्यास केला आहे.

बोस यांच्या विचारांचा अभ्यास करताना बहुतेक संदर्भ हे इंग्रजी व हिंदी भाषेतून आहेत. काही ठिकाणी त्यातील संदर्भाची अचूकता कायम राहावी म्हणून त्यांचे मराठीत भाषांतर न करता आहे तसेच शब्दबद्ध केले आहेत.

सुभाषबाबूंच्या विचारांचे संशोधन करत असताना त्यांच्या जीवन परिचयाची मांडणी करणे आवश्यक आहे. त्यांचा जीवन परिचय लक्षात घेताना त्यांच्या अनाकलनीय मृत्यूचाही संदर्भ येतो. त्यांच्या मृत्यूबाबत अनेक तर्कवितर्क मांडलेले दिसतात. त्यांचा मृत्यू गुढ मानला जातो. त्यामुळे अधिकृत सरकारी दस्तऐवजांप्रमाणे बोस यांच्या मृत्यूसंदर्भात उल्लेख केला आहे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोधप्रबंधात संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब केला आहे. त्यादृष्टीने नेताजी रिसर्च ब्युरो, कलकत्ता यांच्यामार्फत संपादित केलेल्या खंडांचा अभ्यास केला आहे. त्यात प्रामुख्याने नेताजींची भाषणे, लेख, पत्रे यांचा अंतर्भाव आहे. याशिवाय त्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांचेही संदर्भ घेण्यात आले आहेत. तसेच नियतकालिके, मासिके व वर्तमानपत्रांचेही संदर्भ विचारात घेतले आहेत. एकंदरित ऐतिहासिक, ग्रंथालयीन, संशोधनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करून संशोधन केले आहे.